नियमीत दिवाणी दावा क्र. ८/२०२०
शिवबालक वि. दिनेश
निशाणी क्र. १२ खाली

**शपथेवर सरतपास सुरु** :–
**सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. एस.सी. केला यांच्यामार्फत** :–

१) मी अभिलेखावर निशाणी क्र. १२ वर माझे सरतपास शपथपत्र दाखल केले असून त्यातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे माझ्या विधीज्ञांनी लिहून टंकलिखीत केला आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

२) मी निशाणी क्र. ४ सोबत अनुक्रमांक १ वर ग्रामपंचायत कार्यालय, हिवरा बाजार, ता. रामटेक, जि. नागपूर येथील घर क्र. ५०७/२ ची कराची पावती दाखवली. त्यावर ग्रामपंचायत सचिवाची सही आहे. त्यास **निशाणी क्र. ३३** देण्यात येतो.

३) मी निशाणी क्र. ४ सोबत अनुक्रमांक २ वर ग्रामपंचायत कार्यालय, हिवरा बाजार, ता. रामटेक, जि. नागपूर येथील नोंदवहीची सही व शिक्क्याची प्रत दाखल केली आहे. त्यावर सचिव यांची सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी क्र. ३४** देण्यात येतो.

४) मी निशाणी क्र. ४ सोबत अनुक्रमांक ३ वर मी दावा मिळकतीचे ३ फोटो दाखल केले आहेत. त्यास **आर्टिकल–अ** देण्यात येतो.

५) मी निशाणी क्र. ४ सोबत अनुक्रमांक ४ वर मी प्रतिवादीच्या विरुद्ध देवलापार पोलीस स्टेशनला दिलेल्या अदखपात्र गुन्ह्याची प्रत दाखल केलेली आहे. त्यावर माझी व पोलीस अधिका–याची सही आहे. त्यास **निशाणी क्र. ३५** देण्यात येतो.

६) मी निशाणी क्र. ४ सोबत अनुक्रमांक ५ वर मी माझे विधीज्ञ श्री. एस.सी. केला यांच्यामार्फत प्रतिवादीला मी नोटीस दिली होती. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझ्या विधीज्ञांची व माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. ३६** देण्यात येतो.

७)　　मी निशाणी क्र. ४ सोबत अनुक्रमांक ६ व ७ वर पोस्टाची पावती व पोचपावती दाखल केली आहे. त्यास **निशाणी क्र. ३७ व ३८** देण्यात येतो.

८)　　मी निशाणी क्र. १४ सोबत अनुक्रमांक १ वर ग्रामपंचायत हिवरा बाजार येथील कराची पावती दाखल केली आहे. त्यावर सचिवाची सही आहे. त्यास **निशाणी क्र. ३९** देण्यात येतो.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. ए.जी. कारेमोरे यांच्यामार्फत** :-

९)　　उलटतपास प्रतिवादीचे विधीज्ञ यांच्या तोंडी विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत,　　　　माझे समक्ष,

रामटेक.　　　　(एच.एस.सातपुते)

दिनांक : १६/०४/२०२४.　　　　सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रामटेक

**शपथेवर उलटतपास पुन्हा सुरु :-**

**उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. ए.जी. कारेमोरे यांच्यामार्फत** :-

१०)　　हिवरा बाजार या गांवापासुन फुलझरी हे गांव ३ कि.मी. अंतरावर आहे. निशाणी क्र. १२ वर मी दाखल केलेल्या सरतपास शपथपत्रावर माझी सही आहे. आता मला निशाणी क्र. ४१ सोबत अनुक्रमांक १ वर दाखल केलेल्या करारपत्रावरील सही दाखवली. ती सही माझी नाही. ज्या जागेबाबत मी दावा दाखल केला आहे त्याचे खरेदीखत मी दाखल केलेले नाही. मी जागेबाबतचा ७/१२ उतारा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, जे घर होते ते सरकारी (आबादी) जागेवर होते. मी दाव्यामध्ये नमुद केलेला घर नं. ५०७/२ हा सन-२०१४ मध्ये देखील तोच नंबर होता. सन-२०१४

मध्ये सदरच्या घराचा नंबर ५०७/२ हा होता, हे दाखवण्यासाठी मी घरपट्टी पावती दाखल केली आहे. आता मला दाव्यातील रेकॉर्ड दाखवले. त्यामध्ये पावती दाखल नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन–२०१४ मध्ये सदरच्या घराचा नंबर ५०७/२ हा नव्हता म्हणुन मी दावा दाखल करताना त्याबाबतची पावती दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी अपंग आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला जास्तीची कामं करता येत नाही. साक्षीदार स्वतः सांगतो की, मी कपडे शिवतो. हे म्हणणे खरे नाही की, मी अपंग असल्यामुळे मला कोणताही कामधंदा करता येत नाही व मी कपडेही शिवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, घरजागा भाड्याने देताना तसे करारपत्र करावे लागते. साक्षीदार स्वतः सांगतो की, संबंध चांगले असल्यास तसे करारपत्र करण्याची आवश्यकता नाही. हे म्हणणे खरे आहे की, करारपत्र केल्यानंतर त्याच्या किराया पावत्या दिल्या जातात. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यामध्ये व प्रतिवादीमध्ये घर भाड्याने दिल्याबाबतचे किरायापत्र केले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, असे कोणतेही घर मी किरायाने दिले नव्हते त्यामुळे असे किरायापत्र व माझ्यामध्ये झाले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीच्या घराबाबत मी विक्रीचा करारनामा प्रतिवादीबरोबर दिनांक २९/०७/२०१४ रोजी केला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदरच्या वादमिळकतीचा नंबर ३९९ असा होता व त्याचे क्षेत्रफळ ४०० चौ.फु. होते. हे म्हणणे खरे नाही की, ज्या मिळकतीवर घर उभे होते त्या जागेचा मी मालक नसल्यामुळे ज्यावेळी मी त्या जागेचा मालक होईल त्यावेळी त्या जागेचे विक्रीपत्र प्रतिवादीला करुन देण्याचे माझ्यामध्ये व प्रतिवादीमध्ये ठरले होते. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २९/०७/२०१४ रोजी साक्षीदार प्रदीप रंगलदास राजपाल व नंदकिशोर विश्वनाथ बावणे यांच्या उपस्थितीत करार झाला होता.

प्रतिवादी यांचे विधीज्ञ श्री. कारेमोरे यांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत, माझे समक्ष,

रामटेक. (एच.एस.सातपुते)

दिनांक : ०५/११/२०२४. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रामटेक